म. ग्रं. सं. ठाणे.
विषय वाङ्मय
सं. क्र. २

२५८६

REFBK-0025936
REFBK-0025936

संदर्भ

काव्य

२५९६

२५९३६

उपाधाय

२५९६
२५९३६
काव्य उपाचा(र्य)

# तुझे गीत गाण्यासाठी

## मंगेश पाडगावकर यांची पुस्तके

धारानृत्य १९५०

जिप्सी १९५३, १९५९, १९६५, १९६८, १९७२, १९८६, १९८७

निंबोणीच्या झाडामागे १९५४, १९५८

छोरी १९५७, १९८८

शर्मिष्ठा १९६०

उत्सव १९६२

वात्रटिका १९६३

भोलानाथ १९६४

मीरा १९६५

विदूषक १९६६

बबलगम १९६७

सलाम १९७८, १९८१, १९८७

गझल १९८१, १९८९

भटके पक्षी १९८४

तुझे गीत गाण्यासाठी १९८९

# तुझे गीत गाण्यासाठी

मंगेश पाडगावकर

REFBK-0025936

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन
३६१

पहिली आवृत्ती
१० मार्च १९८९

© १९८९, मंगेश पाडगावकर

किंमत
पस्तीस रुपये

मुखपृष्ठ
वासंती मुझुमदार
छायाचित्र
© वासंती मुझुमदार

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

श्रीनिवास खळे आणि यशवंत देव
यांस प्रेमपूर्वक :

तुमच्या संगीताची सोबत लाभल्यामुळे
माझ्या या शब्दांचा प्रवास सुखाचा झाला.

# अनुक्रम


तुझे गीत गाण्यासाठी १
श्रावणात घन निळा बरसला २
कधी बहर, कधि शिशिर ३
मी बोलले न काही ४
अशी पाखरे येती ५
कुठे शोधिसी रामेश्वर ६
होरी ७
नांदी ८
बाहेर बरसती धारा रे ९
रात्र कुसुंबी बहराची १०
न्हाल्या केसांची शपथ तुम्हांला ११
प्रणाम हा तुम्हां जवान हो १२
घडीभराची वसती १३
तुज पाहिले असे १४
पहिलीच भेट झाली १५
लाजून हासणे १६
विसरशील तू सारे १७
सोबतीला चंद्र देते १८
भेट तुझी माझी स्मरते १९
या जगाला तारणारा २०
हृदयाची भाषा फितूर २१
शब्द शब्द जपुन ठेव २२
घन बरसत आले २३
सहज हसुनि पाहतेस २४
धन्य जनी दासी २५
वाटते सर्व सांगावे २६
भातुकलीच्या खेळामधली २७
म्हण तुझी एकदा २८
श्याम नच आला अजुनी घरी २९
शुक्रतारा, मंद वारा ३०
असा बेभान हा वारा ३१
झाहल्या काही चुका ३२
गेला जन्म उन्हात ३३
धुके दाटलेले ३४
मनच्या पाखरा रे ३५
कसं सांगू ३६
ऊठ रे राघवा ३७
थांब रे घना ३८
फूल ठेवुनी गेले ३९
देवाचिये दारापाशी ४०
तारे तुला दिले ४१
वनराणी ४२
आठवेल का सारे? ४३
झाली फुले कळ्यांची ४४
या जगण्यावर शतदा प्रेम करावे ४५
आघाडीवर मी लढताना ४६
निमंत्रण ४७
श्याम मला भेटला ४८
पावसाने केला कहर ४९
पाखरू ५०
चाफ्याची फुले ५१
पहाटे पहाटे ५२
अहो बुद्धदेवा ५३
फूल ते संपले ५४
नीज माझ्या नंदलाला ५५
हात तुझा हातातुन ५६
जपून चाल ५७
दूर राहिला गाव ५८
हलकेच निळा घन आला ५९
तू मनामनांचा राम रे ६०
लाल लाल मेंदीने ६१
आज सजण येणार घरी ६२

पुन्हा ६३
हा दीप तमावर मात करी ६४
दलितांच्या नाथा ६५
जय जय हे भारत देशा ६६
धरिला वृथा छंद ६७
काफिला निघून गेला ६८
मनमोहन श्रावणघन ६९
जेव्हा तुझ्या वटांना ७०
सर्व सर्व विसरु दे ७१
ज्ञान बनो कर्मशील ७२
शपथ तुला आहे ७३
दूत आर्त सांग कुणी ७४
माझी उरले नाही ७५
ती विश्वाची भाषा ७६
सांभाळा घट्ट धरून ७७
ऊन असो वा असो सावली ७८
विहंग आला येथे ७९
शब्दांच्या पलिकडले ८०
दोन हृदयांची कहाणी ८१
ऐक माझे जरा ८२
त्या अनाम वीरांसाठी ८३
दिवस तुझे हे फुलायचे ८४
सावर रे सावर रे ८५
अलिकडे असे ८६
पाण्याहून सांजवेळी ८७
ग्रंथात देव नाही ८८
ना कुणी संगती ८९
आशेवर जीवन तरते रे ९०
भावनांचा तू भुकेला ९१
तुझे घर माझे झाले ९२
दिस मावळण्याआधी ९३
रात्र सरली तरी ९४
हासत जावे जाताना ९५
मोहविते प्रीत पुन्हा ९६
आनंदघन ९७
जगणे म्हणजे उधळित जाणे ९८
मी तुझी कुणी नव्हते ९९
जरि या पुसून गेल्या १००
केली पण प्रीती १०१
कान्हो वनमाळी १०२
माझे जीवन गाणे १०३

काव्य ३७५७८ २५७८६ ३७५७८

# तुझे गीत गाण्यासाठी

तिन्ही लोक आनंदाने भरुन गाउ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे

शुभ्र तुरे माळुन आल्या निळ्या निळ्या लाटा
रानफुले लेवुन सजल्या या हिरव्या वाटा
या सुंदर यात्रेसाठी मला जाउ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे

मोर केशराचे झुलती पहाटेस दारी
झऱ्यातुनी दिडदा दिडदा वाजती सतारी
सोहळ्यात सौंदर्याच्या तुला पाहु दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे

शांत शांत उत्तररात्री मंद मंद तारे
तुझे प्रेम घेउन येती गंधधुंद वारे
चांदण्यात आनंदाच्या मला न्हाउ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे

एक एक नक्षत्राचा दिवा लागताना
आणि फुले होण्यासाठी कळ्या जागताना
पौर्णिमा स्वरांची माझ्या तुला वाहु दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे

# श्रावणात घन निळा बरसला

श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा
उलगडला झाडांतुन अवचित हिरवा मोरपिसारा

जागुनि ज्याची वाट पाहिली ते सुख आले दारी
जिथे तिथे राधेला भेटे आता श्याम मुरारी
माझ्याही ओठांवर आले नाव तुझेच उदारा
श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा

रंगांच्या रानात हरवले हे स्वप्नांचे पक्षी
निळ्या रेशमी पाण्यावरती थेंबबावरी नक्षी
गतजन्मीची ओळख सांगत आला गंधित वारा
श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा

पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदिचे आले
माझ्या भाळावर थेंबांचे फुलपाखरू झाले
मातीच्या गंधाने भरला गगनाचा गाभारा
श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा

पानोपानी शुभशकुनाच्या कोमल ओल्या रेषा
अशा प्रीतिचा नाद अनाहत, शब्दावाचुन भाषा
अंतर्यामी सूर गवसला, नाही आज किनारा
श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशिमधारा

# कधी बहर, कधि शिशिर

१ कधी बहर, कधि शिशिर परंतू दोन्ही एक बहाणे (
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

बहर धुंद वेलीवर यावा
हळुच लाजरा पक्षी गावा
आणि अचानक गळुन पडावी विखरुन सगळी पाने
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

कातरवेळी मिठी जुळावी
पहाट कधि झाली न कळावी
भिन्न दिशांना झुरत फिरावे नंतर दोन दिवाणे
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

हळुच फुलाच्या बिलगुनि गाली
नाजुक गाणी कुणी गायिली
आता उरली आर्त विराणी सूरच केविलवाणे
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

जुळली हृदये, सूरहि जुळले
तुझे नि माझे गीत तरळले
कातरवेळे व्याकुळ डोळे स्मरून आता जाणे
डोळ्यांमधले आसू पुसती ओठांवरले गाणे

# मी बोलले न काही

मी बोलले न काही नुसतेच पाहिले
हृदयात दाटलेले हृदयात राहिले

परतून हाय जाण्या ओठांत शब्द आले
डोळ्यांतले इषारे डोळ्यांत कैद झाले
मी बंद पापण्यांनी हे सर्व साहिले
हृदयात दाटलेले हृदयात राहिले

देऊन सर्व काही नाही दिलेच काही
ज्याला हवे कळाया कळलेहि त्यास नाही
माझ्याच अंतरी मी हे फूल वाहिले
हृदयात दाटलेले हृदयात राहिले

निःशब्द आसवांनी समजाविले मनाला
की शाप वेदनेचा प्रीतीस लाभलेला
माझ्याच भावनांनी मजलाच दाहिले
हृदयात दाटलेले हृदयात राहिले

मी एकटीच दारी आले उठून रात्री
दाटून हाय आले हे आर्त सूर गात्री
माझ्याच मी मनाशी हे गीत गायिले
हृदयात दाटलेले हृदयात राहिले

# अशी पाखरे येती

'अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती
दोन दिसांची रंगत संगत दोन दिसांची नाती'

चंद्र कोवळा पहिलावहिला
झाडामागे उभा राहिला
जरा लाजुनी जाय उजळुनी काळोखाच्या राती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती

फुलुन येता फूल बोलले
मी मरणावर हृदय तोलले
नव्हते नंतर परी निरंतर गंधित झाली माती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती

हात एक तो हळु थरथरला
पाठीवर मायेने फिरला
देवघरातिल समईमधुनी अजून जळती वाती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती

कुठे कुणाच्या घडल्या भेटी
गीत एक मोहरले ओठी
त्या जुळल्या हृदयांची गाथा सूर अजुनही गाती
अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती

# कुठे शोधिसी रामेश्वर

कुठे शोधिसी रामेश्वर अन् कुठे शोधिसी काशी
हृदयातिल भगवंत राहिला हृदयातून उपाशी

झाड फुलांनी आले बहरुन
तू न पाहिले डोळे उघडुन
वर्षाकाळी पाउसधारा
तुला न दिसला त्यांत इषारा
काय तुला उपयोग आंधळ्या दीप असून उशाशी
हृदयातिल भगवंत राहिला हृदयातून उपाशी

रुद्राक्षांच्या गळ्यात माळा
लाविलेस अन् भस्म कपाळा
कधी न घेउन नांगर हाती
पिकविलेस मातीतुनि मोती
हाय अभाग्या भगवे नेसुन घर संन्यासुन जाशी
हृदयातिल भगवंत राहिला हृदयातून उपाशी

देव बोलतो बाळमुखातुन
देव डोलतो उंच पिकांतुन
कधी होउनी देव भिकारी
अन्नासाठी आर्त पुकारी
अवती भवती असुन दिसेना, शोधितोस आकाशी
हृदयातिल भगवंत राहिला हृदयातून उपाशी

# होरी

कां हरी सांग खेळसी होरी ?

अंग अंग हा रंग रंगवी
ही भलती बळजोरी
कां हरी सांग खेळसी होरी ?

बुडणाऱ्याला अधिक बुडविसी
ही असली शिरजोरी
कां हरी सांग खेळसी होरी ?

तुझे रंग उधळण्या शोधिसी
कुळवंताच्या पोरी
कां हरी सांग खेळसी होरी ?

मीच तुझ्या घरि आले म्हणुनी
बोलायाची चोरी
कां हरी सांग खेळसी होरी ?

# नांदी

नटवर शंकर गावा
तो करुणाकर, सदय शुभंकर
हृदयी नित्य स्मरावा

भस्मविभूषित, भाळि सुधाकर
सुरां विघ्नहर, असुरां भयकर
तो ध्यानातुन ध्यावा
नटवर शंकर गावा

त्रिशूलधर तो करिता तांडव
डळमळतो गगनाचा मांडव
भक्तां तोच विसावा
नटवर शंकर गावा

अजेय ज्याचे असे आत्मबल
नीलकंठ जो पिउनि हलाहल
जयजयकार करावा
नटवर शंकर गावा

# बाहेर बरसती धारा रे

बाहेर बरसती धारा रे

मधुनीच वीज थरथरते
क्षण प्राण उजळुनी विरते
करि अधिक गहन अंधारा रे
बाहेर बरसती धारा रे

स्थिर अचल दिशांतुन दाही
निःशब्द वेदना काही
कां व्याकुळ आज किनारा रे
बाहेर बरसती धारा रे

हे मुक्त अनावर सगळे
आकाश इथुन मज दिसले
घर गमे आज मज कारा रे
बाहेर बरसती धारा रे

मी उन्मन, काहि सुचेना
लाटांत निमंत्रण प्राणां
भरतीत मलाच इषारा रे
बाहेर बरसती धारा रे

# रात्र कुसुंबी बहराची

स्पर्शाच्या गहिऱ्या जहराची
ती रात्र कुसुंबी बहराची

ती डोळे जडवुन मला म्हणाली, "राया,
वय ऐनातिल हे नका घालवू वाया"
त्या नजरबंदिच्या कहराची
ती रात्र कुसुंबी बहराची

(घातली लाडकी हळुच खुणेची शीळ
चांदण्यात भिजला गालावरला तीळ)
अशि मदन झोकल्या प्रहराची
ती रात्र कुसुंबी बहराची

काळीज बुडवुनी जाय मधाची लाट
हातात जडवुनी हात शोधिली वाट
स्वप्नांच्या धूसर शहराची
ती रात्र कुसुंबी बहराची

# न्हाल्या केसांची शपथ तुम्हांला

माझ्यासंगं बोला हो मनमोहना
तुमच्यावाचून् जिवाला चैन पडना

लाडे लाडे घाला हो गळा हात
ओली ओली मधाने करा रात
ऐन वेळी रुसु नका सजणा,
तुमच्यावाचून् जिवाला चैन पडना !

काळेभोर भरुन ढग आले,
काळ्जातले मोर वेडे झाले,
कशि अजून् अडली सर झडना !
तुमच्यावाचून् जिवाला चैन पडना !

न्हाल्या केसांची शपथ तुम्हांला
ओल्या श्वासांची शपथ तुम्हांला
ऊर लावा उराशि आता रमणा
तुमच्यावाचून् जिवाला चैन पडना

# प्रणाम हा तुम्हां जवान हो

प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

हाक ऐकता उठून धावला
ना क्षणैक थांबला-त्रिसावला
प्राण मानिला तुम्ही तृणासमान हो
प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

क्रूर आग पेटली चहूकडे
वज्रसे तुम्ही तशातही खडे
चालले अजिंक्य हे पुढे तुफान हो
प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

शत्रुचा विनाश पार संगरी
हेच ध्येय, हाच घोष अंतरी
पिंजल्या उरात रोविले निशाण हो
प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

रक्त वाहते उरात रोधुनी
ठेविलीत खिंड खिंड रोखुनी
चेतवील सर्व देश हे इमान हो
प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

राष्ट्ररक्षणी तुम्ही अनिद्र हो
दिव्य वीरभद्र आणि रुद्र हो
या हिमालयाहुनी तुम्ही महान हो
प्रणाम हा, प्रणाम हा तुम्हां जवान हो

# घडीभराची वसती

घडीभराची वसती इथली घडीभराची वसती

रंक असो वा राव असू दे
शहर असो की गाव असू दे
क्षणाचीच ही ऐट : शेवटी राख होउनी वसती
घडीभराची वसती इथली घडीभराची वसती

हास्य कधी तर कधी आसवे
कधी दुःख कधि सौख्य त्यासवे
या सर्वांची चिता अखेरिस, निर्दय ज्वाळा डसती
घडीभराची वसती इथली घडीभराची वसती

जडवावा मग जीव कशाला?
मरणच जर का उभे उशाला!
ही गर्वाची भव्य गोपुरे धुळीत अंती दिसती
घडीभराची वसती इथली घडीभराची वसती

# तुज पाहिले असे

तुज पाहिले असे अन् नशिबात ये गुलामी

घायाळ काळजाला काही मुळी सुचेना
तुजवाचुनी जिवाला काहीच अन् रुचेना
या भाळल्या जिवाची पहिली अशी सलामी
तुज पाहिले असे अन् नशिबात ये गुलामी

नजरेत धुंद होत्या हुकमी तुझ्या कट्यारी
घालून घाव गेल्या माझ्या असे जिव्हारी
आव्हान झेलले मी, पण जाहलो निकामी
तुज पाहिले असे अन् नशिबात ये गुलामी

डोळ्यांत घेउनी तू आलीस धुंद रात्री
लावून चांदण्याची गेलीस आग गात्री
स्वप्नांस रंग आले हे लाल अन् बदामी
तुज पाहिले असे अन् नशिबात ये गुलामी

# पहिलीच भेट झाली

तो : पहिलीच भेट झाली, पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

ती : पहिलीच भेट झाली, जडली अपूर्व बाधा
स्वप्नात गुंग झाली जागेपणात राधा
माझी न राहिले मी, किमया अशी कुणाची?
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

तो : डोळे मिटून घेता दिसतेस तू समोर
फुलवून पंख स्वप्नी अन् नाचतात मोर
झाली फुले सुगंधी माझ्याहि भावनांची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

ती : लाजून वाजती या अंगातुनी सतारी
ऐश्वर्य घेउनी हे ये दैव आज दारी
मी लागले बघाया स्वप्नेहि मीलनाची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

तो : वाऱ्यात ऐकतो मी आता तुझीच गाणी
ताऱ्यांत वाचतो अन् या प्रीतिची कहाणी

दोघे : पहिलीच भेट झाली, पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

# लाजून हासणे

लाजून हासणे अन् हासून हे पहाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे

डोळ्यांस पापण्यांचा कां सांग भार व्हावा?
मिटताच पापण्या अन् कां चंद्रही दिसावा?
हे प्रश्न जीवघेणे हरती जिथे शहाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे

हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे?
हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे!
तिरपा कटाक्ष भोळा, आम्ही इथे दिवाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे

जाता समोरुनी तू उगवे टपोर तारा
देशातुनी फुलांच्या आणी सुगंध वारा
रात्रीस चांदण्याचे सुचते सुरेल गाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे

# विसरशील तू सारे

हे हात असे जुळलेले
हे नेत्र असे खिळलेले
विसरशील तू सारे
विसरशील तू सारे

हे सांध्यरंग विरतील
तारका नभी झुरतील
हे उदास होतिल वारे
विसरशील तू सारे

मधुगंध धुंद उडताना
तिमिरात चंद्र बुडताना
मी स्मरेन सर्व इषारे
विसरशील तू सारे

तू जिथे कुठे असशील
स्वप्नात मला दिसशील
तुज कळेल पण हे का रे?
विसरशील तू सारे

# सोबतीला चंद्र देते

सोबतीला चंद्र देते, अंतरीचा ध्यास देते
तू जिथे जाशील तेथे मी तुला विश्वास देते

चांदण्याच्या पावलांनी मी तुझ्या स्वप्नात आले
त्या निळ्या बेहोष रात्री मी तुझ्याशी एक झाले
मीलनाला साक्ष होते ते तुला मी श्वास देते
तू जिथे जाशील तेथे मी तुला विश्वास देते

संचिताचे सूर माझ्या एकदा छेडून घे तू
घाल ती वेडी मिठी अन् एकदा वेढून घे तू
जन्मती हे सूर जेथे ते तुला आभास देते
तू जिथे जाशील तेथे मी तुला विश्वास देते

तू कुठेही जा, सुखी हो, चंद्र माझा साथ आहे
गीत माझे घेउनी जा, प्राण माझा त्यात आहे
तृप्तिला हेवा जिचा ती लोचनांची प्यास देते
तू जिथे जाशील तेथे मी तुला विश्वास देते

# भेट तुझी माझी स्मरते

भेट तुझी माझी स्मरते अजुन त्या दिसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

कुठे दिवा नव्हता, गगनी एकही न तारा
आंधळ्या तमातुन वाहे आंधळाच वारा
तुला मुळी नव्हती बाधा भीतिच्या विषाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

क्षुद्र लौकिकाची खोटी झुगारून नीती
नावगाव टाकुनि आली अशी तुझी प्रीती
तुला परी जाणिव नव्हती तुझ्या साहसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

केस चिंब ओले होते, थेंब तुझ्या गाली
ओठांवर माझ्या त्यांची किती फुले झाली
श्वासांनी लिहिली गाथा प्रीतिच्या रसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

सुगंधीच हळव्या शपथा, सुगंधीच श्वास
स्वप्नातच स्वप्न दिसावे तसे सर्व भास
सुखालाहि भोवळ आली मधुर सुवासाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

# या जगाला तारणारा

या जगाला तारणारा जन्मला हो जन्मला
एकुनी धावा जगाचा बाळ तान्हा जाहला

एक ती साधी गव्हाणी
सत्य हो जेथे सुवार्ता,
ईश्वराचा पुत्र तेथे
होउनी ये थोर त्राता
संपली सत्ता तमाची, सूर्य आता भेटला
या जगाला तारणारा जन्मला हो जन्मला

अंतरी कारुण्य वाहे
प्रेम, सेवा धर्म याचा
नाव याचे घेतल्याने
अंत साऱ्या बंधनांचा
जो कधी विझणार नाही दीप ऐसा पेटला
या जगाला तारणारा जन्मला हो जन्मला

राज्य याचे ईश्वराचे
क्रूस हा घेईल हाती
रक्त हा देईल अपुले
मानवाच्या मुक्तिसाठी
नाथ हा लाभे अनाथा, शाप आता संपला
या जगाला तारणारा जन्मला हो जन्मला

# हृदयाची भाषा फितूर

हृदयाची भाषा फितूर झाली अधरा
हातास जुईचा बांधुन आलिस गजरा

केसांत चमकले कलाबतूचे तारे
आळसले अंगी वसंतातले वारे
मदनाने केला लवुन तुला गऽ मुजरा
हातास जुईचा बांधुन आलिस गजरा

रंगली अबोली ओथंबुन ओठांत
मेंदीची स्वप्ने विरघळली बोटांत
तू फूल फुलाहुन, जीव लाजराबुजरा
हातास जुईचा बांधुन आलिस गजरा

नवसाला आली फुले तुझ्या हसण्यात
लाजले चांदणे थरथरत्या रुसण्यात
विसरल्या पापण्या तुला पाहता नजरा
हातास जुईचा बांधुन आलिस गजरा

# शब्द शब्द जपुन ठेव

शब्द शब्द जपुन ठेव बकुळिच्या फुलापरी

काय बोलले नकळे
तू समजुन घे सगळे
लाविलीस ज्योत तूच या उदास अंतरी
शब्द शब्द जपुन ठेव बकुळिच्या फुलापरी

दुःख नको तुटताना
अश्रु नको वळताना
मी मिटता लोचन हे उमलशील तू उरी
शब्द शब्द जपुन ठेव बकुळिच्या फुलापरी

साक्ष लाख ताऱ्यांची
स्तब्ध अचल वाऱ्याची
ज्योत बनुन जळले रे मी तुझ्या पथावरी
शब्द शब्द जपुन ठेव बकुळिच्या फुलापरी

# घन बरसत आले

घन बरसत बरसत आले

वनि मोराचा षड्ज लागला
झाडांतुन मल्हार जागला
मन चकित, सुगंधित झाले
घन बरसत बरसत आले

शिवधनुष्य कडकडले वरती
सुखावली आशेने धरती
खग तोरण धरित उडाले
घन बरसत बरसत आले

सजल धुंद आनंद चहुंकडे
नभ रत्नांचे तृणात उघडे
वन निथळत अमृत न्हाले
घन बरसत बरसत आले

# सहज हसुनि पाहतेस

सहज हसुनि पाहतेस, चंद्र उरी जागे
हृदय हृदय जोडितात हे रेशिमधागे

स्वप्नांनी वेढितेस
तार तार छेडितेस
मधुर मधुर जादुगार सूर हा तुझा गे
सहज हसुनि पाहतेस, चंद्र उरी जागे

चालताच तू समोर
थबकतात चकित मोर
वळुनि वळुनि पुष्पलता पाहतात मागे
सहज हसुनि पाहतेस, चंद्र उरी जागे

सूर असा लागताच
चंद्र असा जागताच
जन्म जन्म दरवळतो कुसुमित अनुरागे
सहज हसुनि पाहतेस, चंद्र उरी जागे

# धन्य जनी दासी

नामदेवापरी त्याची धन्य जनी दासी
भावाचा भुकेला केला तिने विठ्ठलासी

नामयाची जनी लोळे संतांचिये पायी
म्हणे कीर्तनाचा रस देई गे विठाई
जिवाचे तोरण केले देवाच्या दारासी
नामदेवापरी त्याची धन्य जनी दासी

जनाबाईवर जेव्हा आला खोटा आळ
सूळाची देवाने केली तुळशीची माळ
काळजाची साथ अशी मिळे काळजासी
नामदेवापरी त्याची धन्य जनी दासी

नवल वर्तले अंती देवाचिये पायी
ज्योत जळून काजळी उरलीच नाही
आकाश जनीच्या उरी आले माहेरासी
नामदेवापरी त्याची धन्य जनी दासी

# वाटते सर्व सांगावे

वाटते सर्व सांगावे, मी मनात जुळवुनि येते
येताच तुझ्या जवळी रे मी शब्द विसरुनी जाते

तू हसुनि पाहसी तेंव्हा उठतात मनात तरंग
मी वेल जाइची होते, डवरते फुलांनी अंग
मग मिटून वेडे डोळे त्या सुगंधात मी न्हाते
येताच तुझ्या जवळी रे मी शब्द विसरुनी जाते

डोळ्यांवर फिरवुनि श्वास वाटते जवळ तू घ्यावे
हृदयात पराग फुलांच्या चांदण्यात भिजुनी जावे
बोलते मीच माझ्याशी हे अबोल असले नाते
येताच तुझ्या जवळी रे मी शब्द विसरुनी जाते

प्रत्येक फुलाची जेंव्हा चांदण्यात होते राधा
मिसळते मीहि त्यांच्यात प्राशून उरीची बाधा
त्या कुंजवनात स्वरांच्या माझेहि गीत मी गाते
येताच तुझ्या जवळी रे मी शब्द विसरुनी जाते

# भातुकलीच्या खेळामधली

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

राजा वदला, "मला समजली शब्दांवाचुन भाषा
माझ्या नशिबासवे बोलती तुझ्या हातच्या रेषा"
कां राणीच्या डोळां तेव्हा दाटुनि आले पाणी?
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

राणी वदली बघत एकटक दूरदूरचा तारा
"उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा"
पण राजाला उशिरा कळली गूढ अटळ ही वाणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

तिला विचारी राजा, "कां हे जीव असे जोडावे?
कां दैवाने फुलण्याआधी फूल असे तोडावे?"
या प्रश्नाला उत्तर नव्हते, राणी केविलवाणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

कां राणीने मिटले डोळे दूर दूर जाताना?
कां राजाचा श्वास कोंडला गीत तिचे गाताना?
वाऱ्यावरती विरून गेली एक उदास विराणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी

# म्हण तुझी एकदा

म्हण तुझी एकदा मज सजणा

दूर कुठेतरि थरथरता स्वर
अधीर होते माझे अंतर
स्वप्नात दरवळे जवळपणा
म्हण तुझी एकदा मज सजणा

सांजवेळ ही आर्त दाटते
हुरहुरले आकाश वाटते
मज मुळि न साहवे दूरपणा
म्हण तुझी एकदा मज सजणा

निशिगंधापरि फुलल्या रात्री
भरुनि चांदणे माझ्या गात्री
कधि हृदयाशी घेशिल रमणा
म्हण तुझी एकदा मज सजणा

# श्याम नच आला अजुनी घरी

काहुर दाटे उरी
श्याम नच आला अजुनी घरी

घरा परतली गोकुळातली सर्व गुरेवासरे
घरटयांमधुनी शांत जाहली रानातिल पाखरे
अंधारावर झुळ्ढ लागले दिवे लालकेशरी
श्याम नच आला अजुनी घरी

अदय कुशंका मनास छळते, भयद डोह आठवे
दुष्ट वेळ का सांगुन येते ? खोल जीव कालवे
देवांचा जरि देव, आइचा बाळच आहे परी
श्याम नच आला अजुनी घरी

इडापिडा टळतील, लाविला देवापुढती दिवा
शुभशकुनापरि शुभ्र तारका धीर देतसे जिवा
शब्दांआधी ऐकू आली त्याची मज बासरी
श्याम नच आला अजुनी घरी

# शुक्रतारा, मंद वारा

तो : शुक्रतारा, मंद वारा, चांदणे पाण्यातुनी
चंद्र आहे, स्वप्न वाहे धुंद या गाण्यातुनी
आज तू डोळ्यांत माझ्या मिसळुनी डोळे पहा
तू अशी जवळी रहा....तू अशी जवळी रहा

ती : मी कशी शब्दांत सांगू भावना माझ्या तुला ?
तू तुझ्या समजून घे रे लाजणाऱ्या या फुला
अंतरीचा गंध माझ्या आज तू पवना वहा
तू असा जवळी रहा....तू असा जवळी रहा

तो : लाजऱ्या माझ्या फुला रे गंध हा विलगे जिवा
अंतरीच्या स्पंदनाने अन् थरारे ही हवा
भारलेल्या या स्वरांनी भारलेला जन्म हा
तू अशी जवळी रहा....तू अशी जवळी रहा

ती : शोधिले स्वप्नात मी ते ये करी जागेपणी
दाटुनी आलास तू रे आज माझ्या लोचनी
वाकला फांदीपरी आता फुलांनी जीव हा
तू असा जवळी रहा....तू असा जवळी रहा

२५८६ २५८६

# असा बेभान हा वारा

असा बेभान हा वारा, कुठे ही नाव मी नेऊ?
नदीला पूर आलेला, कशी येऊ, कशी येऊ?

जटा पिंजून या लाटा निखाळी झेप ही घेती
भिडे काळोख प्राणांना, दिशांचे भोवरे होती
जिवाचे फूल हे माझ्या तुझ्या पायी कशी ठेवू?
नदीला पूर आलेला, कशी येऊ, कशी येऊ?

कुळाचे, लौकिकाचे मी क्षणी हे तोडिले धागे
बुडाले गाव ते आता, बुडाले नावही मागे
दिले हे दान दैवाने करी माझ्या कशी घेऊ?
नदीला पूर आलेला, कशी येऊ, कशी येऊ?

जगाच्या क्रूर शापांचे जिव्हारी झेलले भाले
तुझे सौभाग्य ल्याया हे तुझी होऊन मी आले
तुझे तू घे उरी आता, किती मी हाक ही देऊ?
नदीला पूर आलेला, कशी येऊ, कशी येऊ?

# जाहल्या काही चुका

जाहल्या काही चुका अन् सूर काही राहिले
तू दिलेले गीत माझे आवडीने गायिले

चांदण्यांच्या मोहराने रात्र केव्हा दाटली
काजळी काळ्या ढगांनी हाक केव्हा घातली
मी स्वरांच्या लोचनांनी विश्व सारे पाहिले
तू दिलेले गीत माझे आवडीने गायिले

सौख्य माझे, दुःख माझे, सर्व माझ्या भावना
मोर स्वप्नांचे निळे अन् विंधणाऱ्या वेदना
मी असे गीतांतुनी सर्वस्व माझे वाहिले
तू दिलेले गीत माझे आवडीने गायिले

संपता पूजा स्वरांची हात तू देशील का?
दाटुनी काळोख येता तू घरी नेशील का?
पूर्णतेसाठीच या मी सर्व काही साहिले
तू दिलेले गीत माझे आवडीने गायिले

# गेला जन्म उन्हात

उभा हा गेला जन्म उन्हात, उभा हा गेला जन्म उन्हात

इथे सुखाचा सूर हरपला
निःश्वासांनी चंद्र करपला
अशा जिण्याचे चित्र पाहतो सुकलेल्या सुमनांत
उभा हा गेला जन्म उन्हात, उभा हा गेला जन्म उन्हात

किती झेलले वादळवारे
कोसळले आधारहि सारे
घरात भरल्या असूनही मी वणवणलो विजनात
उभा हा गेला जन्म उन्हात, उभा हा गेला जन्म उन्हात

रितीच अंती उरली ओंजळ
शोष गळ्याला, भवती मृगजळ
वठून गेले झाड एकटे माझ्या भग्न मनात
उभा हा गेला जन्म उन्हात, उभा हा गेला जन्म उन्हात

# धुके दाटलेले

धुके दाटलेले उदासऽ उदासऽ
मला वेढिती हे तुझे सर्व भास

उभी मूक झाडे, विरागी किनारा
झुरे अंतरी अन् फिरे आर्त वारा
कुणीही न येथे दिसे आसपास
धुके दाटलेले उदासऽ उदासऽ

कुठे चालल्या या दिशाहीन वाटा?
कुणा शोधिती या उदासीन लाटा?
दिशांतून दाटे तुझा एक ध्यास
धुके दाटलेले उदासऽ उदासऽ

क्षणी भास होतो तुझे सूर येती
जिवा भारुनी हे असे दूर नेती
स्मृती सोबतीला असा हा प्रवास
धुके दाटलेले उदासऽ उदासऽ

# रानच्या पाखरा रे

रानच्या पाखरा रे उगिच भेट झाली

वाहत होते पाणी
झऱ्यात धुंद गाणी
फुलांत गंध होता, गंधात भेट न्हाली
रानच्या पाखरा रे उगिच भेट झाली

प्रीतीची धुंद भाषा
लाविते गोड आशा
मोकळ्या आभाळाची तुला रे हाक आली
रानच्या पाखरा रे उगिच भेट झाली

विरही उरे सूर
पाखरू गेले दूर
एकटी उभी येथे झुरत झाडाखाली
रानच्या पाखरा रे उगिच भेट झाली

# कसं सांगू

कसं सांगू किती झालि खुशी
मानेखाल्ची हरवली उशी

खोटा खोटा आधि मी केला त्रागा
म्हटूलं जरा सांभाळून वागा
झाले उजव्याची डाव्या कुशी
कसं सांगू किती झालि खुशी

कसं फुलवायूचं फूल् तुम्हि जाणता
अशि डोळ्यांवर भूल् तुम्हि आणता
पोहु लागूले मी मासूळी जशी
कसं सांगू किती झालि खुशी

दोन्ही डोळे सुखाने धुंद झाले
तुमच्या मिठीत मी बंद झाले
माझी मीच पडूले अशि फशी
कसं सांगू किती झालि खुशी

# ऊठ रे राघवा

उघड लोचन अता, ऊठ रे राघवा

सूर्य क्षितिजावरी कांचनाच्या रथीं
रत्नकण सांडले या सुनिर्मल पथीं
देव प्राचीवरी उधळिती वैभवा
उघड लोचन अता, ऊठ रे राघवा

पाखरांचे गळे जाहले मोकळे
किरण पाण्यावरी उतरले कोवळे
उमलल्या पाकळ्या, जाग ये राजिवा
उघड लोचन अता, ऊठ रे राघवा

वृक्षगण डोलुनी तुजसि रे बाहती
सौंगडी लाडके वाट हे पाहती
रंग घेऊन ये नभ तुझ्या गौरवा
उघड लोचन अता, ऊठ रे राघवा

जाग रे राजसा, संपली ही निशा
गंध चोहीकडे, उजळल्या दशदिशा
तेज-आनंद रे तूच माझ्या जिवा
उघड लोचन अता, ऊठ रे राघवा

# थांब रे घना

थांब रे घना,
जा निरोप घेउनी, सांग मोहना

कुंज कुंज हा उदास
जागेपणि होत भास
तूच एक जाणिसी माझिया मना
जा निरोप घेउनी, सांग मोहना

एकटीच झुरत उभी
तारका न एक नभी
एकटीच सोसते सर्व यातना
जा निरोप घेउनी, सांग मोहना

सांग जाउनी तयास :
वैरी माझेच श्वास
फूलही मला इथे होय वेदना
जा निरोप घेउनी, सांग मोहना !

# फूल ठेवुनी गेले

जे तुझ्याचसाठी होते केवळ फुलले
वाटेत तुझ्या मी फूल ठेवुनी गेले

रथ ऐश्वर्याचा या वाटेने गेला
जयघोष तुझा मग सर्व जगाने केला
मी दूर एकटी, माझे डोळे ओले
वाटेत तुझ्या मी फूल ठेवुनी गेले

त्या फुलासारखी अबोल माझी प्रीत
ती अबोल पूजा या माझ्या हृदयात
नच ओठांवरती नाव तुझे कधि आले
वाटेत तुझ्या मी फूल ठेवुनी गेले

तुज कसे कळावे देवा? नाही कळले :
मी दूर अलक्षित तुजसाठी तळमळले
त्या फुलात माझे हृदय ठेवुनी गेले
वाटेत तुझ्या मी फूल ठेवुनी गेले

# देवाचिये दारापाशी

देवाचिये दारापाशी नाही कुळयाती
पंढरीच्या पायरीशी एक सर्व नाती

देवाने लाविला उरी चोखोबा महार
देवाने जवळ केला नरहरी सोनार
देव भुका भिल्लिणीच्या उष्ट्या बोरांसाठी
देवाचिये दारापाशी नाही कुळयाती

दळताना जनी पडे थकूनिया अंग
हाती घेवोनिया जाते दळिती श्रीरंग
विटेवरी युगे उभा विठू जगजेठी
देवाचिये दारापाशी नाही कुळयाती

शेख महम्मद होता जन्मे मुसलमान
त्याच्याही भक्तीची लागे विठ्ठला तहान
तुका वाणी धन्य झाला इंद्रायणीकाठी
देवाचिये दारापाशी नाही कुळयाती

पंढरीच्या वाळवंटी सारे एकाकार
नाही कोणी शिंपी, वाणी, ब्राम्हण, महार
माणसाचा हात इथे माणसाच्या हाती
देवाचिये दारापाशी नाही कुळयाती

# तारे तुला दिले

कोमेजल्या फुलांची गाथा मुकी उशाला
माझेच स्वप्न झाले माझीच बंदिशाला
काळोख घेतला मी, तारे तुला दिले

मार्गावरी तुझ्या मी केला दिवा जिवाचा
काव्यांत वाट माझी हा मार्ग वैभवाचा
हे गंधभारलेले वारे तुला दिले
काळोख घेतला मी, तारे तुला दिले

झेलून दुःख घ्यावे, हासून अन् जळावे
ज्याच्या उरात प्रीती त्यालाच हे कळावे
वनवास घेतला मी, सारे तुला दिले
काळोख घेतला मी, तारे तुला दिले !

# वनराणी

हिरव्या तरुराजीत तिथे उभी राहशिल का ?
हासत होतिस पूर्वि तशी पुन्हा हासशिल का ?

किलबिल तिथल्या पानोपानी
फुलासारखे कोमल पाणी
वनराणी होऊन तिथे मला पाहशिल का ?
हिरव्या तरुराजीत तिथे उभी राहशिल का ?

जे शब्दांची उधळुनि दौलत
पूर्ण कधीही नाही उमलत
अबोध ते मौनातुन तू मला सांगशिल का ?
हिरव्या तरुराजीत तिथे उभी राहशिल का ?

हसरे सुंदर डोळे जडवुन
निळ्या जळापरि अथांग होउन
कधी न सुटणारे कोडे पुन्हा घालशिल का ?
हिरव्या तरुराजीत तिथे उभी राहशिल का ?

## आठवेल का सारे?

तुला ते आठवेल का सारे?
दवात भिजल्या जुईपरी हे मन हळवे झाले रे

तुझ्या करातिल मोरपीस ते
अजून गालांवरुनी फिरते
बनातुनी केतकिच्या येती सुगंध शिंपित वारे
तुला ते आठवेल का सारे?

त्या तरुवेली, तो सुमपरिमळ
झऱ्यांतली चांदीची झुळझुळ
आठवणींच्या चिंचा गाभुळ रुचतिल काय तुला रे?
तुला ते आठवेल का सारे?

ते सारे मी हृदयी जपते
उगिच लाजते, उगीच हसते
हृदयामधल्या देवासाठी हवेत का देव्हारे?
तुला ते आठवेल का सारे?

# झाली फुले कळ्यांची

जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली
झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली

दूरातल्या दिव्यांचे मणिहार मांडलेले
पाण्यात चांदण्यांचे आभाळ सांडलेले
कैफात काजव्यांची अन् पालखी निघाली
झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली

केसांतल्या जुईचा तिमिरास गंध होता
श्वासातल्या लयीचा आवेग अंध होता
वेड्या समर्पणाची वेडी मिठी मिळाली
झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली

नव्हतेच शब्द तेव्हा, मौनात अर्थ सारे
स्पर्शात चंद्र होता, स्पर्शात लाख तारे
ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली
झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली

## या जगण्यावर शतदा प्रेम करावे

या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती
हिरवे हिरवे प्राण तशी ही रुजून आली पाती
फुले लाजरी बघुन कुणाचे हळवे ओठ स्मरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

रंगांचा उघडुनिया पंखा सांज कुणी ही केली ?
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली
सहा ऋतूंचे सहा सोहळे, येथे भान हरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

बाळाच्या चिमण्या ओठांतुन हाक बोबडी येते
वेलीवरती प्रेम प्रियेचे जन्म फुलांनी घेते
नदिच्या काठी सजणासाठी गाणे गात झुरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

या ओठांनी चुंबुनि घेइन हजारदा ही माती
अनंत मरणे झेलुन घ्यावी इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळपानावरती अवघे विश्व तरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

# आघाडीवर मी लढताना

तो : आघाडीवर मी लढताना मूर्ति तुझी नयना दिसते
तेव्हा माझ्या बाहूंमध्ये शत वज्रांचे बळ असते

ती : मी तुळशीला दिवा लावुनी प्राणांची ओंजळ करिते
इडापिडा टळतील अमंगळ; ज्योत सावरुन मी धरिते

तो : मी लढतो प्रिय देशासाठी, अपुल्या इतिहासासाठी
वीराला प्रत्येक येथल्या प्राणांहुन प्रिय ही माती

ती : रोज मुलांना कथा सांगते श्रीकृष्णाची, शिवबाची
अन् रावण जिंकुनि येणाऱ्या वीर धनुर्धर रामाची

तो : सांग आइला, बाळ तिचा हा आणिल विजयाची माला
तिच्या हातची झुणकाभाकर हवीच आहे मग त्याला
थालिपीठ अन् तुझ्या हातचे, पापा चिमण्या बाळाचा
हे माझे, मी यांच्यासाठी मार्ग चालतो विजयाचा

ती : शौर्य गाजवुन याल घरी हो विजयी होउन तुम्हि जेव्हा
मी डोळ्यांची करुनि आरती ओवाळिन माझ्या देवा

तो : परसामधल्या फुलझाडांना घालतेस ना तू पाणी ?
देशातिल प्रत्येक फुलास्तव लढतो आम्ही अभिमानी
दिवा घरातिल संथ जळावा, देवळात कीर्तन व्हावे
यासाठी शिर तळहातावर घेउनिया आम्ही जावे

ती : मी तुळशीला दिवा लावुनी प्राणांची ओंजळ करिते
इडापिडा टळतील अमंगळ; ज्योत सावरुन मी धरिते !

तो : आघाडीवर मी लढताना मूर्ति तुझी नयना दिसते
तेव्हा माझ्या बाहूंमध्ये शत वज्रांचे बळ असते

# निमंत्रण

मज सजणाघरचे आज निमंत्रण आले
मी न कुणाची आता उरले, घर सोडून निघाले

पाश येथले, मोह येथले, इथली ममता मिटली
हाक मला सजणाची येता प्राण निरंजन झाले

काळोखाचा पहाड दुर्गम, वाट बिकट चढणीची
सूर आतला सापडल्यावर कोण कधी का भ्याले ?

त्यजिले सारे इथले वैभव, मी शून्याने नटले
आनंदाच्या क्षणात असल्या हे आभाळ बुडाले

पट फिटला, मज सजण भेटला माझा अंतर्यामी
त्या भेटीची शकुनलक्षणे मी अंगावर ल्याले

# श्याम मला भेटला

श्रावणात श्याम मला भेटला
हात माझा हातामधे घेतला

त्याने वाजविली वेणू
टकमक झाल्या धेनू
चिंब तरी, देह माझा पेटला
श्रावणात श्याम मला भेटला

श्वास त्याचे भालावर
मोरपीस गालावर
चंदनाचा गंध उरी दाटला
श्रावणात श्याम मला भेटला

सुरांनी वेढिले मला
जवळ ओढिले मला
गळ्यामधे हार माझ्या घातला
श्रावणात श्याम मला भेटला

# पावसाने केला कहर

रात्रभर पाव्‌साने केला कहर बाई
पाण्यामधे भिजून गेलं शहर बाई

सुखी होती माझी शेज
कसं सांगू ? वाटे लाज !
माझ्यासंगे होता ग माझा भ्रमर बाई
रात्रभर पाव्‌साने केला कहर बाई

जीव दिला मी झोकून
त्याने घेतला झेलून
माझ्या अंगी जाईजुईचा बहर बाई
रात्रभर पाव्‌साने केला कहर बाई

मिठीमधे माझा श्याम
पुरविले सारे काम
सुगंधाने न्हाऊन गेले प्रहर बाई
रात्रभर पाव्‌साने केला कहर बाई

## पाखरू

झाड् माझं फुलून हसलं
पाखरू येऊन बसलं

गोऱ्या गालावर काळा तीळ
त्याने हळूच घातली शीळ
आणि बघता बघता फसलं
झाड् माझं फुलून हसलं
पाखरू येऊन बसलं

मऊमऊ मखमली अंग
त्याच्या डोळ्यांत उधाण रंग
त्याला ठाऊक सगळं तसलं
झाड् माझं फुलून हसलं
पाखरू येऊन बसलं

साऱ्या रातीला खुशीत होतं
माझ्या उबेला कुशीत होतं
माझ्या ओठांना लाडाने डसलं
झाड् माझं फुलून हसलं
पाखरू येऊन बसलं

## चाफ्याची फुले

चाफ्याची फुले तुझ्या केसांत ओली ओली
सरीत श्रावणाच्या पहिली भेट झाली

रेशमी नदीकाठ
लाजरी पायवाट
अनोळ्या पाखराची भिजून शीळ आली
चाफ्याची फुले तुझ्या केसांत ओली ओली

पाण्यात काळी होडी
झुकली होती थोडी
हळूच बिलगून कोवळी लाट गेली
चाफ्याची फुले तुझ्या केसांत ओली ओली

नदीच्या पाण्यावर
मनात गाण्यावर
झुकले इंद्रधनू, रंगल्या रानवेली
चाफ्याची फुले तुझ्या केसांत ओली ओली

भिजून चालताना
फुलून बोलताना
सुगंधी कुजबूज वाऱ्याने पैल नेली
चाफ्याची फुले तुझ्या केसांत ओली ओली

२५०६६
२५०३६
काव्य ३०/७/८९

# पहाटे पहाटे

पहाटे पहाटे सावळा माझा येऊन गेला बाई
काही न मागता, हवे होते ते देऊन गेला बाई

अंगणात मोगऱ्याचा घमघमे वास
तसा माझ्या अंगी त्याचा दाटे सहवास
मिटल्या डोळ्यांत मोहन माझा मोहून गेला बाई
पहाटे पहाटे सावळा माझा येऊन गेला बाई

अंगभर झेलताना फुलांचा पाऊस
म्हणाले मी, "रहा असा, नको रे जाऊस!"
गंधओली रात्र प्राणांत माझ्या ठेवून गेला बाई
पहाटे पहाटे सावळा माझा येऊन गेला बाई

मिटला ग भेद आता जवळ नि दूर
अणूरेणूतून त्याच्या वेणूचेच सूर
चांदण्याने चिंब जीव हा माझा न्हाऊन गेला बाई
पहाटे पहाटे सावळा माझा येऊन गेला बाई

# अहो बुद्धदेवा

नमस्कार घ्यावा अहो बुद्धदेवा
घुमे प्रार्थना, अंतरी दीप लावा

हरा दुःखभ्रांती
तुम्ही दिव्य शांती
दिला या जगा मंत्र कारुण्य-सेवा
नमस्कार घ्यावा अहो बुद्धदेवा

नसे भेद काही
अता खेद नाही
असा लाभला थोर आनंदठेवा
नमस्कार घ्यावा अहो बुद्धदेवा

मने शुद्ध जेथे
वसे बुद्ध तेथे
नुरो या जगी क्रूरता, द्वेष, हेवा
नमस्कार घ्यावा अहो बुद्धदेवा

नमो शुद्धरूपा
नमो आत्मदीपा
तमातून या मानवा मार्ग दावा
नमस्कार घ्यावा अहो बुद्धदेवा

# फूल ते संपले

फूल ते संपले, गंध ना राहिला
हाक तू एकिली, साद नाही दिला

मार्ग माझा अता चालतो एकला
मी न कोणी इथे, नाहि मी येथला
शून्य काळोख हा अंतरी साहिला
फूल ते संपले, गंध ना राहिला

सोसुनी वेदना गीत गातो कुणी
लेखुनी क्षुद्र त्या आणि जातो कुणी
मीहि जागेपणी खेळ हा पाहिला
फूल ते संपले, गंध ना राहिला

भेट झाली तिची याद ठेवू नये
आणि स्वप्नामधे भेट घेऊ नये
तू सुखी हो तिथे, शाप माझा मला
फूल ते संपले, गंध ना राहिला

# नीज माझ्या नंदलाला

नीज माझ्या नंदलाला, नंदलाला रे

शांत हे आभाळ सारे
शांत तारे, शांत वारे
या झऱ्याचा सूर आता मंद झाला, मंद झाला रे
नीज माझ्या नंदलाला, नंदलाला रे

झोपल्या गोठ्यात गाई
साद वा पडसाद नाही
पाखरांचा गल्बलाही बंद झाला, बंद झाला रे
नीज माझ्या नंदलाला, नंदलाला रे

सावल्यांची तीट गाली
चांदण्याला नीज आली
रातराणीच्या फुलांचा गंध आला, गंध आला रे
नीज माझ्या नंदलाला, नंदलाला रे

नीज रे आनंदकंदा,
नीज रे माझ्या मुकुंदा
आवरी या घागऱ्यांच्या छंदताला, छंदताला रे
नीज माझ्या नंदलाला, नंदलाला रे

# हात तुझा हातातुन

तो : हात तुझा हातातुन धुंद ही हवा
ती : रोजचाच चंद्र आज भासतो नवा

तो : रोजचेच हे वारे, रोजचेच तारे
भासते परी नवीन विश्व आज सारे
ती : ही किमया स्पर्शाची भारिते जिवा
हात तुझा हातातुन धुंद ही हवा

ती : या हळव्या पाण्यावर मोहरल्या छाया
मोहरले ह्रदय तसे मोहरली काया
तो : चांदण्यात थरथरतो मधुर गारवा
हात तुझा हातातुन धुंद ही हवा

तो : जन्म जन्म दुर्मिळ हा क्षण असला येतो
स्वप्नांच्या वाटेने चांदण्यात नेतो
ती : बिलगताच जाईचा उमलतो थवा
हात तुझा हातातुन धुंद ही हवा

ती : क्षणभर मिटले डोळे, सुख न मला साहे
।विरघळून चंद्र आज रक्तातुन वाहे।
तो : आज फुले प्राणातुन केशरी दिवा
दोघे : हात तुझा हातातुन धुंद ही हवा
रोजचाच चंद्र आज भासतो नवा

# जपून चाल

जपून चाल् पोरी जपून चाल्,
बघूणाऱ्या माणूसाच्या जिवाचे हाल् !

लाडाने वळून बघायची खोड्
नाजूक नखऱ्याला नाही या तोड्
डोळ्यांत काजळ, गुलाबी गाल्
जपून चाल् पोरी जपून चाल्

केसांत सुरंगी रंगात ग
विजेची लवलव अंगात ग
खट्याळ पदराला आवर घाल्
जपून चाल् पोरी जपून चाल्

जिंकीत जिंकीत जातेस तू
ज्वानीचं गाणं हे गातेस तू
हासून होतेस लाजून लाल्
जपून चाल् पोरी जपून चाल्

उरात लागलेत नाचाया मोर्
कोणाच्या गळ्याला लागेल दोर् ?
माझ्या या काळजाचा चुकेल ताल्
जपून चाल् पोरी जपून चाल्

# दूर राहिला गाव

दूर राहिला गाव
अजून घेती स्मृती तेथल्या या हृदयाचा ठाव

संथ वाहते नदी निरामय
काठावर सुंदर देवालय
मृदुंग आणिक झांज झेलिती भजनामधले भाव
दूर राहिला गाव

करीत किलबिल पक्षी भ्रमती
शेतकरी शेतांतुन श्रमती
इथे मनाच्या श्रीमंतीला निळामोकळा वाव
दूर राहिला गाव

घरा परतली गुरेवासरे
नक्षत्रांनी गगन मोहरे
नदिच्या काठी माझ्यासाठी वाट पाहते नाव
दूर राहिला गाव

# हलकेच निळा घन आला

हलकेच निळा घन आला, बरसुन गेला
थरथरती पाने झिमझिम भिजवुन गेला

मज नावहि त्याचे ठाउक नव्हते बाई
लावण्य निळे हे असे पाहिले नाही
प्राणांत निळी नवलाई उधळुन गेला
हलकेच निळा घन आला, बरसुन गेला

कोणत्या जन्मिचा गाढ निळा हा पाश?
ओथंबुन झुकले निळे निळे आकाश
हा वीज निळी नजरेला जडवुन गेला
हलकेच निळा घन आला, बरसुन गेला

कां व्याकुळ झाले? होता का तो भास?
त्या चिंब क्षणांचा गूढ निळा सहवास
घननीळ वेदना मागे ठेवुन गेला
हलकेच निळा घन आला, बरसुन गेला

# तू मनामनांचा राम रे

तू मनामनांचा राम रे
तू श्रावणात घन श्याम रे

दिव्यरूप तू दशरथनंदन
ऋषीमुनींचे अक्षय प्रियधन
भक्तजनां सुखधाम रे
तू श्रावणात घन श्याम रे

रघुपति राघव वीर धनुर्धर
दुष्टविनाशक, मंगल, भयहर
मृत्युंजय निष्काम रे
तू श्रावणात घन श्याम रे

पदस्पर्श होताच शिळेतुन
मुक्त अहिल्या पावन होउन
तारक सुंदर नाम रे
तू श्रावणात घन श्याम रे

पूर्णचंद्र सीताहृदयाचा,
प्राणच केवळ हनुमंताचा
संजीवक अभिराम रे
तू श्रावणात घन श्याम रे

# लाल लाल मेंदीने

लाल लाल मेंदीने रंगलेत हात रे
जुळता हातात तुझ्या रंगधुंद रात रे

झाडाच्या आडुन मधुचंद्र उगवलेला
मेंदीच्या रंगाने तोहि रंगलेला
रंगांची पुनव आज लाजऱ्या क्षणांत रे
लाल लाल मेंदीने रंगलेत हात रे

मी तुझेच स्वप्न बघत गुणगुणले गाणी
अंगणात मेंदीला आणि दिले पाणी
होउनिया स्वप्न खरे आज गीत गात रे
लाल लाल मेंदीने रंगलेत हात रे

मोगरिच्या हाराने घमघमली काया
गंधाने भारावुन जड झाल्या छाया
जन्म जन्म लाभो मज तुझी अशी साथ रे
लाल लाल मेंदीने रंगलेत हात रे

# आज सजण येणार घरी

आज सजण येणार घरी
चैन नसे मज, सजुन उभी मी
उगवे चंद्र उरी

धूप उसासे शयनमहाली
लज्जेची गालांवर लाली
ज्योत दिव्याची अधीर झाली
माझ्याहुन बावरी
आज सजण येणार घरी

चिडवित होते मज भरले घन
तळमळले मी व्याकुळ होउन
अता बरसतिल अंगावरती
धुंद सुखाच्या सरी
आज सजण येणार घरी

मावेना डोळ्यांत चांदणे
शुभशकुनाची सर्व लक्षणे
मोरपिसापरि झुळुक लाजरी
फिरते अंगावरी
आज सजण येणार घरी

## पुन्हा

उद्याला पुन्हा याल का ?
जवळ मला घ्याल का ?

वसंत धुंद आहे
फुलांचा गंध वाहे
बागेत मला न्याल का ?
जवळ मला घ्याल का ?

रंगला विडा मुखी
कालची रात्र सुखी
सुखाने तसे न्हाल का ?
जवळ मला घ्याल का ?

चांदणं गोरं गोरं
बाहेर पाठमोरं
भिजले माझे गाल का ?
जवळ मला घ्याल का ?

ओठांनी गाल पुसा
लाडके तसे हसा
वचन मला द्याल का ?
जवळ पुन्हा घ्याल का ?

## हा दीप तमावर मात करी

अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी

पुसुनि आसवे हसुनि जरा बघ
अनंत ताऱ्यांची वर झगमग
ये परत, परत ये तुझ्या घरी
अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी

पिसाट वारे, वन वादळले
सूड घ्यावया जळ आदळले
ध्रुवतारा आहे अढळ तरी
अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी

घावावाचुन नसे देवपण
जळल्यावाचुन प्रकाश कोठुन ?
कां सांग निराशा तुझ्या उरी ?
अंधार दाटला घोर जरी
हा दीप तमावर मात करी

# दलितांच्या नाथा

जय भीम, जय भीम, दलितांच्या नाथा
माणुसकीच्या देवा, तू अमुचा त्राता

रूढीची राक्षशीण घालितसे धाक
तूच दिली दुबळ्यांना लढण्याची हाक
तू धरिला समतेचा धगधगता पलिता
जय भीम, जय भीम, दलितांच्या नाथा

माणसास हीन म्हणे तो नाही धर्म
माणसास दूर करी ते पापी कर्म
बुद्धाच्या करुणेचा तू नव उद्गाता
जय भीम, जय भीम, दलितांच्या नाथा

घडल्यावर दीनांवर जुलुम जगी कोठे
नाव तुझे घेताक्षणि आग उरी पेटे
कुणि न हीन, कुणि न शूद्र, उन्नत हा माथा
जय भीम, जय भीम, दलितांच्या नाथा

लाख लाख हृदयांतुन दाटुन ये भक्ती
शब्द तुझे मंत्र अम्हा, स्मरण तुझे शक्ती
प्रेरक तू, तारक तू, मुक्तीचा नेता
जय भीम, जय भीम, दलितांच्या नाथा

# जय जय हे भारत देशा

तू नव्या जगाची आशा
जय जय हे भारत देशा

तपोवनातुन तुझ्या उजळली उपनिषदांची वाणी
मातीमधुनी तुझ्या जन्मल्या नररत्नांच्या खाणी
जय युगधैर्याच्या देशा
जय नवसूर्याच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

बळापुढे वा छळापुढे नच इथे वाकल्या माना
अन्यायाला भरे कापरे बघुनि शूर अभिमाना
जय आत्मशक्तिच्या देशा
जय त्यागभक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

श्रमांतुनी पिकलेली शेते पहा डोलती धुंद
घामाच्या थेंबांतुन सांडे हृदयातिल आनंद
जय हरित क्रांतिच्या देशा
जय विश्वशांतिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

पहा झोपड्या कंगालांच्या थरारल्या भवताली
अंधाराला जाळित उठल्या झळकत लाख मशाली
जय लोकशक्तिच्या देशा
जय दलितमुक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

# धरिला वृथा छंद

धरिला वृथा छंद
नव्हतेच जर फूल, कोठून मकरंद ?

जरि जीव हो श्रान्त
नाही तृषा शान्त
जलशून्य आभास शोधीत मृग अंध
धरिला वृथा छंद

झाले तुझे भास
मी रोधिले श्वास
माझीच मज आस घाली असा बंध
धरिला वृथा छंद

पथ सर्व वैराण
पायी नुरे त्राण
माझेच घर आज झाले मला बंद
धरिला वृथा छंद

# काफिला निघून गेला

चांद हा बुडून गेला
काफिला निघून गेला

खिन्न दाटले धुके
पान पान हे मुके
साजण भुलून गेला
काफिला निघून गेला
चांद हा बुडून गेला

फूल राहिले इथे
हे उदास एकटे
गंध हा उडून गेला
काफिला निघून गेला
चांद हा बुडून गेला

हाक घातली तरी
खिन्नता भरे उरी
आवाज विरून गेला
काफिला निघून गेला
चांद हा बुडून गेला

स्वप्न संपले असे
आर्त राहिले पिसे
प्राण हा झुरून गेला
काफिला निघून गेला
चांद हा बुडून गेला

# मनमोहन श्रावणघन

मनमोहन श्रावणघन
सजल धुंद गंधित वन

भरलेले रंग रंग
पुलकित हो अंग अंग
स्वप्नच जणु नील गगन
मनमोहन श्रावणघन

उंच उंच माडांवर
या हिरव्या झाडांवर
रिमझिमझिम यौवनधन
मनमोहन श्रावणघन

थरथरले पान पान
रंगभूल रान रान
मंतरले अवघे क्षण
मनमोहन श्रावणघन

# जेव्हा तुझ्या बटांना

जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा
माझा न राहतो मी हरवून हा किनारा

आभाळ भाळ होते, होती बटाहि पक्षी
ओढून जीव घेते पदरावरील नक्षी
लाटांस अंतरीच्या नाही मुळी निवारा
जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा

डोळे मिटून घेतो, छळ हा तरी चुकेना
ही वेल चांदण्याची ओठांवरी झुकेना
देशील का कधी तू थोडा तरी इषारा
जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा

नशिबास हा फुलांचा कां सांग वास येतो
हासून पाहिल्याचा नुसताच भास होतो
केव्हा तुझ्या खुषीचा उगवेल सांग तारा?
जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा

# सर्व सर्व विसरु दे

ती : सर्व सर्व विसरु दे, गुंतवू नको पुन्हा
येथ जीव जडविणे हाच होतसे गुन्हा

तो : हे धुके, अशी हवा, ही उदासता भरे
सूर सूर मिटुनिया लोपलीत पाखरे
हास हास लाडक्या श्रावणातल्या उन्हा

ती : सर्व सर्व विसरु दे, गुंतवू नको पुन्हा
रात्र रात्र जागुनी वाट पाहिली कुणी,
मंद होउनी विरे अन् पहाटचांदणी,
स्वप्न संपुनी असे ये कठोर वंचना
सर्व सर्व विसरु दे, गुंतवू नको पुन्हा

तो : काय मोर थांबतो मेघ दाटता शिरी?
भान राधिके नुरे ऐकताच बासरी
बंधतात जन्मतो मुक्तिचा खरेपणा
हास हास लाडक्या श्रावणातल्या उन्हा

ती : हाक धुंद ही तुझी अंग अंग वेढिते
होउनी प्रवाह या बंधनात ओढिते
मी मला अजाणता गुंतले अशी पुन्हा

तो : हास हास लाडक्या श्रावणातल्या उन्हा
दोघे : धुंद धुंद गंध ये दाटुनी फुलाविना

# ज्ञान बनो कर्मशील

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर :
लाख लाख कंठांतुन हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान
पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतो
हृदयातुन समतेचा निर्भय अभिमान
पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान
पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान

# शपथ तुला आहे

दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

बकुळीच्या झाडाखाली निळ्या चांदण्यात
हृदयाची ओळख पटली सुगंधी क्षणात
त्या सगळ्या बकुळफुलांची शपथ तुला आहे
दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

शुभ्र फुले रेखित रचिला चांद तू जुईचा
म्हणालीस, "चंद्रोत्सव हा सावळ्या भुईचा !"
फुलांतल्या त्या चंद्राची शपथ तुला आहे
दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

भुरभुरता पाउस होता सोनिया उन्हात
गवतातुन चालत होतो मोहुनी मनात
चुकलेल्या त्या वाटेची शपथ तुला आहे
दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

हळूहळू काजळताना सांज ही सुरंगी
तुझे भास दाटुनि येती असे अंतरंगी
या उदास आभाळाची शपथ तुला आहे
दिल्याघेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे

# दूर आर्त सांग कुणी

दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी
पारिजातकुसुमे ही उधळिली मनावरी

एकाकीपण सरले
मी माझी नच उरले
भान असे हरले अन् मी झाले बावरी
दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी

यमुनेचे हे पाणी
चकित होय मजवाणी
कानांनी प्राणांनी प्राशियली माधुरी
दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी

कुठुनी हे येति सूर ?
लावितात मज हुरहुर
फडफडतो तडफडतो प्राणविहग पंजरी
दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी

मी मजला विसरावे
बुडुनि सुरांतच जावे
बासरी न दूर सखे, ती माझ्या अंतरी
दूर आर्त सांग कुणी छेडिली असावरी

# माझी उरले नाही

गडे मज नको विचारू काही
जरा पाहिले आणि उमगले माझी उरले नाही

बासरिचा मी सूर ऐकिला
श्याम मला पण नाहि भेटला
सूर मला तो दूर दूर परि पहा भुलवुनी नेई
जरा पाहिले आणि उमगले माझी उरले नाही

कितिदा तरि मी मन आवरले
पुन्हा पुन्हा मी मज सावरले
परी अचानक बावरले अन् पडले खोल प्रवाही
जरा पाहिले आणि उमगले माझी उरले नाही

कसे सांगु मी शब्दच अपुरे
कसे गाउ जर गीतच अधुरे
उगिच झुरे पण हृदयपाखरू, शून्य दिशा या दाही
जरा पाहिले आणि उमगले माझी उरले नाही

कुणि सांगावे ? भेट न होइल
गीत सदाचे अधुरे राहिल
फूल न गवसे, धुंद तयाचा गंध छळत पण राही
जरा पाहिले आणि उमगले माझी उरले नाही

# ती विश्वाची भाषा

मी शिकविन संगीत प्रथम तुज,
ती विश्वाची भाषा !
परमेशाचे स्वप्न येतसे
स्वरांतुनीच विकासा !

पहाट होता, जगा खगांची
जागविते भूपाळी,
त्या गीताने जागृत होतो
हृदयातिल वनमाळी

ग्रीष्म जेधवा प्रबळ होउनी
चराचराला जाळी,
घुमे मेघमल्हार तदा
संजीवक वर्षाकाळी

वनावनातुन वसंत कधि दे
रंगांची ललकारी,
झऱ्याझऱ्यातुन दिडदा दिडदा
करिती साथ सतारी

आणि कुठेतरि कुणी विरहिणी
आर्त जोगिया गाई
दूर दूर क्षितिजावर धूसर
खिळवुनि लोचन पाही

चराचरातुन हे संगीतच
भरुनी भरुनी वाहे
रहस्य त्याचे, ताल तयाचा
अपुल्या हृदयी आहे

## सांभाळा घट्ट धरून

वाहे जोराचा वारा
त्यात अंधार सारा
जीव झाला घाबरा
मला सांभाळा घट्ट धरून

पहा कलली होडी
आता झुकली थोडी
लाट पाण्यात ओढी
मला सांभाळा घट्ट धरून

कोणी नव्हते जागे
आले तुमच्या मागे
आणि जोडले धागे
मला सांभाळा घट्ट धरून

हात हातात घ्यावा
मला उराशी लावा
किती करू मी धावा
मला सांभाळा घट्ट धरून

# ऊन असो वा असो सावली

तो : ऊन असो वा असो सावली, काटे अथवा फुले असू दे
या वाटेवर तुझ्या संगती जीव जडवुनी मला हसू दे

ती : कधी निराशा खिन्न दाटली, कधी भोवती रान पेटले
परी अचानक वळणावरती निळे निळे चांदणे भेटले
गूज मनातिल सांगत तुजला चांदण्यात या मला बसू दे
या वाटेवर तुझ्या संगती जीव जडवुनी मला हसू दे

तो : कळी एकदा रुसुनि म्हणाली, "नाही मी भुलणारच नाही,
किती जरी केलीस आर्जवे तरिही मी फुलणारच नाही!"
फुलून आली कधी न कळले, तशी लाजरी पुन्हा रुसू दे
या वाटेवर तुझ्या संगती जीव जडवुनी मला हसू दे

ती : तुझ्यासवे मी चालत असता मला फुलांचे कळे मनोगत
तू असताना क्षितिजावरती इंद्रधनूचे उमटे स्वागत

तो : पारिजात अंगात बहरुनी रंग रंग डोळ्यांत दिसू दे
या वाटेवर तुझ्या संगती जीव जडवुनी मला हसू दे

ती : सांजघनाचा सोनकेवडा भिजवित आली ही हळवी सर
तुझ्या नि माझ्या भवतीचे जग स्वप्नापरि हे झाले धूसर

तो : तुला बिलगुनी चिंब भिजू दे, असे अनावर सुख बरसू दे
दोघे : या वाटेवर तुझ्या संगती जीव जडवुनी मला हसू दे!

# विहंग आला येथे

सात समुद्रापलिकडुनी तो विहंग आला येथे

खुषीत येउन पिसे फुलविली
हळुच खुणेची शीळ घातली
ओझरते पाहियले नुसते आणिक जुळले नाते
सात समुद्रापलिकडुनी तो विहंग आला येथे

त्या दिवशी मी मला विसरले
पीस होउनी हवेत तरले
स्वतःभोवती गरगर फिरले, मिटुनि गाढ नयनांते
सात समुद्रापलिकडुनी तो विहंग आला येथे

मी न बोलता त्याला कळले
रहस्य जे मी मनात जपले
त्या दिवशी मी पाहियले जागेपणात स्वप्नाते
सात समुद्रापलिकडुनी तो विहंग आला येथे

उगीच झुरते तेव्हापासुन
उगिच पाहते क्षितिज न्याहळुन
अन् एकान्ती राधा होउन कुंजवनी मी जाते
सात समुद्रापलिकडुनी तो विहंग आला येथे

# शब्दांच्या पलिकडले

शब्दावाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले
प्रथम तुला पाहियले आणिक घडू नये ते घडले

अर्थ नवा गीतास मिळाला
छंद नवा अन् ताल निराळा
त्या दिवशी कां प्रथमच माझे सूर सांग अवघडले ?
शब्दावाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले

होय म्हणालिस नकोनकोतुन
तूच व्यक्त झालीस स्वरातुन
नसता कारण व्याकुळ होउन उगिच हृदय धडधडले
शब्दावाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले

आठवते पुनवेच्या रात्रीं
लक्ष चंद्र विरघळले गात्री
मिठीत तुझिया या विश्वाचे रहस्य मज उलगडले
शब्दावाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले

# दोन हृदयांची कहाणी

दोन हृदयांची कहाणी, दोन हृदयांची कहाणी

पौर्णिमेच्या शुभ्र रात्री
चांदणे दाटून गात्री
गूज सांगावे तिने, त्याच्या मनी फुलवीत गाणी
दोन हृदयांची कहाणी, दोन हृदयांची कहाणी

गीत ते त्याने लिहावे
अन् तिने मधु सूर व्हावे
अंतरी त्याच्या व्यथा : यावे तिच्या डोळ्यांत पाणी
दोन हृदयांची कहाणी, दोन हृदयांची कहाणी

ती सुगंधी भेट केव्हा
खिन्न ताटातूट केव्हा
मीलनाची आस ती अन् आसवांची ती विराणी
दोन हृदयांची कहाणी, दोन हृदयांची कहाणी

वादळे संपून गेली
दोन हृदये एक झाली
गौरवाचे गीत गाते पाखरांची धुंद वाणी
दोन हृदयांची कहाणी, दोन हृदयांची कहाणी

# ऐक माझे जरा

मान वेळावुनी धुंद बोलू नको
चालताना अशी वीज तोलू नको
ऐक माझे जरा
हट्ट नाही खरा
दृष्ट लागेल गऽ दृष्ट लागेल गऽ

आज वारा बने रेशमाचा झुला
ही खुषीची हवा साद घाली तुला
मोर सारे तुझे
हे पिसारे तुझे
रूप पाहून हे चंद्र भागेल गऽ
दृष्ट लागेल गऽ दृष्ट लागेल गऽ

पाहणे हे तुझे चांदण्याची सुरी
हाय मी झेलली आज माझ्या उरी
लाट मोठी फुटे
शीड माझे कुठे ?
ही दिशा कोणती ? कोण सांगेल गऽ?
दृष्ट लागेल गऽ दृष्ट लागेल गऽ

# त्या अनाम वीरांसाठी

घनघोर तिमिर असताना ते ज्योत होउनी जळले
घेऊन वीज प्राणांची ते जुलुमावर कोसळले
घरदार सोडिले त्यांनी, तोडिले पाश मायेचे
घेतले निखारे हाती, उधळून छत्र छायेचे

त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे
त्या स्मृतीवरी शूरांच्या ही फुले ठेविते आहे

मातेच्या मुक्तीसाठी हृदयात पेटला ध्यास
मानिली फुलांची माला तो गळ्याभोवती फास
ते फकीर देशासाठी, हातात घेतली झोळी
'जय भारतमाता' म्हणता छातीतुन शिरली गोळी

त्या मृत्युंजय रक्ताचा मी टिळा लाविते आहे
त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे

हातात तिरंगा धरुनी ते कोसळताना वदले :
"हा आहे देश महान" अन् विझता विझता हसले
हा उत्सव स्वातंत्र्याचा त्या बलिदानाचा आहे
हा विजयसोहळा सारा त्या समर्पणाचा आहे

आजच्या यशाला त्यांची मी शपथ घालिते आहे
त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे

## दिवस तुझे हे फुलायचे

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे

स्वप्नात गुंगत जाणे
वाटेत भेटले गाणे
गाण्यात हृदय झुरायचे
दिवस तुझे हे फुलायचे

मोजावी नभाची खोली
घालावी शपथ ओली
श्वासात चांदणे भरायचे
दिवस तुझे हे फुलायचे

थरारे कोवळी तार :
सोसेना सुरांचा भार
फुलांनी जखमी करायचे
दिवस तुझे हे फुलायचे

माझ्या या घराच्यापाशी
थांब तू गडे जराशी
पापण्या मिटून भुलायचे
दिवस तुझे हे फुलायचे

# सावर रे सावर रे

सावर रे सावर रे उंच उंच झुला
सुख मला भिवविते सांगू कसे तुला

आता आभाळ भेटले रे
अंग फुलांनी पेटले रे
पहा कसे ऐकू येती श्वास माझे मला
सावर रे सावर रे उंच उंच झुला

फांदी झोक्याने हालते रे
वाटे स्वप्नी मी चालते रे
मिटले मी माझे डोळे, हात हाती दिला
सावर रे सावर रे उंच उंच झुला

जुने आधार सुटले रे
तुझ्या मिठीत मिटले रे
सांभाळ तू बावरल्या वेड्या तुझ्या फुला
सावर रे सावर रे उंच उंच झुला

# अलिकडे असे

अलिकडे असे दिवसाहि चांदणे दिसते
अलिकडे अकारण मी माझ्याशी हसते

हो जीव असा हळुवार
थरथरे मनातिल तार
मी बघता बघता मला हरवुनी बसते
अलिकडे असे दिवसाहि चांदणे दिसते

होतात अचानक भास
मन होते उगिच उदास
मी बोलत असते तरि मी बोलत नसते
अलिकडे असे दिवसाहि चांदणे दिसते

मी मनात होते राधा
जडतसे फुलांची बाधा
माझ्याच सावळ्या स्वप्नावर मी रुसते
अलिकडे असे दिवसाहि चांदणे दिसते

# पाण्याहून सांजवेळी

पाण्याहून सांजवेळी जात होते घरी
अडवून वाट माझी उभा राहे हरी

मनात मी बावरले
कशीबशी सावरले
अचानक तोच हाय कोसळल्या सरी
अडवून वाट माझी उभा राहे हरी

आभाळात ओले रंग
चिंब चिंब माझे अंग
काय उपयोग आता सावरून तरी ?
अडवून वाट माझी उभा राहे हरी

पडे अनोळखी भूल
फुलले मी जसे फूल
बासरीचे सूर माझ्या झाले प्राणभरी
अडवून वाट माझी उभा राहे हरी

काही बोलले मी नाही
वितळल्या दिशा दाही
चांदण्याचा राजहंस धरिला मी उरी
अडवून वाट माझी उभा राहे हरी

# ग्रंथात देव नाही

ग्रंथात देव नाही, पंथात देव नाही
हृदयात देव आहे, कोणी अनाथ नाही

निर्मून घास आधी, पक्ष्यास चोच देतो
हे पंख देतसे जो, आभाळ तोच देतो
त्याची दया अशी ही भरली दिशांत दाही
हृदयात देव आहे, कोणी अनाथ नाही

श्रद्धाच पांगळ्याच्या पायांत त्राण आहे
श्रद्धाच आंधळ्याच्या डोळ्यांत प्राण आहे
ज्याच्या उरी न श्रद्धा त्याला पहाट नाही
हृदयात देव आहे, कोणी अनाथ नाही

आधार दुःखिताचे होतात हात ज्याचे
सेवेत धर्म आहे, सेवेत तीर्थ ज्याचे
सहवास ईश्वराचा त्याला वनात नाही
हृदयात देव आहे, कोणी अनाथ नाही

# ना कुणी संगती

ना कुणी संगती, साथ ना सोबती
क्रूर काळोख हा, दीप ना भोवती

हीं हवा वादळी
रात्र ही आंधळी
मेघ काळे वरी, भास वेडावती
क्रूर काळोख हा, दीप ना भोवती

नाव जाते कुठे?
दैव नेते कुठे?
दुष्ट लाटा जशा नागिणी धावती
क्रूर काळोख हा, दीप ना भोवती

ना इशारा मला
ना किनारा मला
फाटले शीड हे, प्राण भांबावती
क्रूर काळोख हा, दीप ना भोवती

# आशेवर जीवन तरते रे

ही रात्र कधितरी सरते रे
आशेवर जीवन तरते रे

सुकलेल्या फांदीवर येती नवीन पाने
आणि वाटते तसे जगावे पुन्हा नव्याने
जळ पुन्हा ढगांतुन भरते रे
ही रात्र कधितरी सरते रे

उजाड झाल्या माळावर वासंतिक वारे
आणि अचानक अंधारावर झुलती तारे
मौनातुन गाणे झरते रे
ही रात्र कधितरी सरते रे

काळोखाच्या काठावरती तांबुस चाहुल
रत्नांच्या पाण्यात उषेचे भिजते पाउल
प्राणात पाखरू स्फुरते रे
ही रात्र कधितरी सरते रे

# भावनांचा तू भुकेला

भावभोळ्या भक्तिची ही एकतारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी

काजळी रात्रीस होसी तूच तारा
वादळी नौकेस होसी तू किनारा
मी तशी आले तुझ्या ही आज दारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी

भाबडी दासी जनी गाताच गाणी
दाटुनी आले तुझ्या डोळ्यांत पाणी
भक्तिचा वेडा असा तू चक्रधारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी

शापिलेली ती अहिल्या मुक्त केली
आणि कुब्जा स्पर्श होता दिव्य झाली
वैभवाचा साज नाही, मी भिकारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी

अंतरीची हाक वेडी घालते रे
वाट काट्यांची अशी मी चालते रे
जाणिसी माझी व्यथा ही तूच सारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी

# तुझे घर माझे झाले

उंबरठ्यावर माप उलटुनी तुझ्या मागुनी आले
करात कर गुंफिला, तुझे घर माझे आता झाले

स्मितातुनीं चांदणे निथळले
भाळावर सौभाग्य उजळले
या सनईच्या सुरात मंगल सगळे जीवन न्हाले
करात कर गुंफिला, तुझे घर माझे आता झाले

आज फुले हसली माझ्याशी
सुख आले फुलुनी हृदयाशी
पाश जुने तोडून तुझ्यास्तव प्रथमच आज निघाले
करात कर गुंफिला, तुझे घर माझे आता झाले

जिथे जिथे तू, तिथे तिथे मी
डोळ्यांनी आनंद पिते मी
जुळलेल्या हृदयांचे गाणे माझे सूर म्हणाले
करात कर गुंफिला तुझे घर माझे आता झाले

# दिस मावळण्याआधी

त्याने ठेवला हळुच हात गाली
दिस मावळण्याआधी रात झाली

एक्दा नेलं उसाच्या फडामागे
आणि पुन्हा ओसाड गडामागे
तिथं पावलं आम्ची सात झाली
दिस मावळण्याआधी रात झाली

जरा काकणबी वाजलं नाही
वीट पाखरू लाजलं नाही
बोलल्यावाचून् समदी बात झाली
दिस मावळण्याआधी रात झाली

चांदणं मोहाचं मळ्यात होतं
गाणं ज्वानीचं गळ्यात होतं
मंद मंद दिव्याची वात झाली
दिस मावळण्याआधी रात झाली

# रात्र सरली तरी

तो : रात्र सरली तरी नाहि कळले तुला
खिलगुनी तू मला अजुन माझ्या फुला

ती : स्वप्न की जाग ही? मी अशी संभ्रमी
नाहि कळले मला, नाहि कळले तुला

तो : गूज माझे-तुझे अजुनही सांगतो
सोनचाफा तुझ्या धुंद केसतांला

ती : लाजरी जाग ये पाखरांच्या स्वरा
गंध वाऱ्यात हा कोवळा दाटला

तो : ते तुझें हासणे, लाजुनी बोलणे
श्वास माझे-तुझे चांदण्याचा झुला

दोघे : रात्र सरली तरी रात्र उरली उरी
हात हे गुंफले, जीव हा गुंतला

# हासत जावे जाताना

रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना

अंगावर आसूड विजेचे
झेलुन घेती घन वर्षेचे
सार्थक झाले कोसळण्याचे, तृषित धरित्री न्हाताना
रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना

हासत हासत ज्योती जळली
काळोखाची रात्र उजळली
पहाट झाली तेंव्हा नव्हती, तेजोमय जग होताना
रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना

बीज आतुनी फुटून गेले
वेदनेत या फूल जन्मले
अमरपणाचा अर्थ आकळे, मरण झेलुनी घेताना
रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना

कुणि दुःखाचा घोट घेतला
खोल व्यथेने प्राण पेटला
त्या दुःखाचे झाले गाणे, जीव उधळुनी गाताना
रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना

# मोहविते प्रीत पुन्हा

नको नको म्हटले तरि मोहविते प्रीत पुन्हा
मुक्या मुक्या बासरीत कोण भरी गीत पुन्हा ?

गेले जरि दूर दूर
जवळ मला घेति सूर
या अबोल तारांतुन झरते संगीत पुन्हा
नको नको म्हटले तरि मोहविते प्रीत पुन्हा

पाण्यावर हा तरंग
पुलकित करि अंग अंग
हृदयातुन रंग रंग श्रावण उधळीत पुन्हा
नको नको म्हटले तरि मोहविते प्रीत पुन्हा

कधि किमया लाटांची
कधि अवखळ वाटांची
क्षितिजावर बांधि कुणी तोरण रंगीत पुन्हा
नको नको म्हटले तरि मोहविते प्रीत पुन्हा

जुळले हातांत हात
डोळ्यांतुन चांदरात
वेलीवर फूल फूल झुलते धुंदीत पुन्हा
नको नको म्हटले तरि मोहविते प्रीत पुन्हा

# आनंदघन

वरसला अंगावरी आज आनंदाचा घनू

आज मन गगनात
आणि गगन मनात
माझे प्राण इंद्रधनू
वरसला अंगावरी आज आनंदाचा घनू

रंग श्रवणासि आले
सूर सुवासिक झाले
झाली बासरीच तनू
वरसला अंगावरी आज आनंदाचा घनू

नभ झाले मेघभोर
मनभर निळे मोर
झाल्या आतुर या धेनू
वरसला अंगावरी आज आनंदाचा घनू

कोसळला प्राणभर
सावळा हा अनावर
जैसा देवकीनंदनू
वरसला अंगावरी आज आनंदाचा घनू

# जगणे म्हणजे उधळित जाणे

(कै० रामूभैया दाते यांच्यासाठी)

आत आपुल्या झरा झुळझुळे निळा निळा स्वच्छंद
जगणे म्हणजे उधळित जाणे हृदयातिल आनंद

घनधारांतुन ख्याल ऐकतो रंगुनि मल्हाराचा
बघता बघता मोरपिसारा साऱ्या संसाराचा
मनात पाउस बरसे उधळित मातीचा मधुगंध
जगणे म्हणजे उधळित जाणे हृदयातिल आनंद

दु:खाला आधार नको का? तेहि कधितरी येते
दोस्त होउनी हातच माझा अपुल्या हाती घेते
जो जो येइल त्याचे स्वागत, दार न कधिही बंद
जगणे म्हणजे उधळित जाणे हृदयातील आनंद

झाडाची झुलणारी फांदी कधी लावणी भासे
साधा कोरा कागदही कधि चंद्र होउनी हासे
सर्वत्रच तो बघतो धुंदी, डोळे ज्याचे धुंद
जगणे म्हणजे उधळित जाणे हृदयातिल आनंद

कधी कुणाचे आसू पुसता बोटांनी हळुवार
हात होतसे वाद्य : सुरांचे पाझरती झंकार
प्रेमाच्या या गाण्यासाठी प्रेमाचा हा छंद
जगणे म्हणजे उधळित जाणे हृदयातिल आनंद

# मी तुझी कुणी नव्हते

मी तुझी कुणी नव्हते आणि कुणी नाही
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

झुरते बन माडांचे आणि शुक्र तारा
भरतीचे स्वप्न बघत विकल हा किनारा
रंग रंग विरले रे, खिन्न दिशा दाही
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

सांजवेळ, संथ डोह, हाक जीवघेणी
शब्दांविण डोळ्यांनी वाचिली कहाणी
तो वेडा स्पर्श काय छळिल रे तुलाही ?
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

कां चुकल्या वाटा अन् कां घडल्या भेटी ?
कां जपले दवहळवे गीत तुझ्यासाठी ?
सूर सूर बुडले रे अदय या प्रवाही
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

सूर मनातिल कधिही आणु नये ओठी
लावु नये जीव असा कधिच कुणासाठी
निर्माल्यच ये करात, गंध उडुनि जाई
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

पुढल्या जन्मीच पुरे हे अधुरे गाणे
पुढल्या जन्मीच खरे स्वप्न हे दिवाणे
चुरलेली शपथ तिथे विसरणार नाही
विसर सर्व घडलेले, विसर तू मलाही

# जरि या पुसून गेल्या

जरि या पुसून गेल्या साऱ्या जुन्या खुणा रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

त्या बावऱ्या कळीने ते स्वप्न पाहिलेले
वेड्या क्षणास एका सर्वस्व वाहिलेले
छळतो अजून जीवा तो लाजरा गुन्हा रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

ते श्वास कापरे अन् आभास सावल्यांचे
रे चांदणेच झाले डोळ्यांत बाहुल्यांचे
अन् सूर सूर झाल्या त्या सर्व भावना रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

नाही विचार केला, मी पाहिले न मागे
आले तुझ्याकडे मी तोडून सर्व धागे
का घालिता उडी ही घर आठवे कुणा रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

मी घातली उडी हा नच दोष रे कुणाचा
चुरडे कळी मनाची हा खेळ प्राक्तनाचा
स्वप्ने विरून येते हातांत वंचना रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

हरवून स्वप्न गेले, अश्रूच आज जागे
वेडी तुझी कळी ही बघते वळून मागे
कां पापण्यांत मिटते निःशब्द वेदना रे
हा चंद्र पाहताना होते तुझी पुन्हा रे

# केली पण प्रीती

अखेरचे येतिल माझ्या हेच शब्द ओठी :
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

इथे सुरू होण्याआधी संपते कहाणी
साक्षीला केवळ उरते डोळ्यांतिल पाणी
जखम उरी होते ज्यांच्या तेच गीत गाती
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

सर्व बंध तोडुनि जेव्हा नदी धुंद धावे
मीलन वा मरण पुढे हे तिला नसे ठावे
एकदाच आभाळाला अशी भिडे माती
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

गंध दूर ज्याचा आणिक जवळ मात्र काटे
असे फूल प्रीती म्हणजे कधी हाय वाटे
तरी गंध धुंदित धावे जीव तुझ्यासाठी
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

आर्त गीत आले जर हे कधी तुझ्या कानी
गूज अंतरीचे कथिले तुला या स्वरांनी
डोळ्यांतुन माझ्यासाठी लाव दोन ज्योती
लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती

# कान्हो वनमाळी

आज अंतर्यामी भेटे
कान्हो वनमाळी
अमृताचा चंद्रमा भाळी
उगवला हो

फुलांचे केसरा
घडे चांदण्याचा संग
आज अवघे अंतरंग
ओसंडले हो

मिटूनही डोळे
दिसू लागले आकाश
आज सारा अवकाश
देऊळ झाला हो

काही न बोलता
आता सांगता ये सारे
आतली प्रकाशाची दारे
उघडली हो

# माझे जीवन गाणे

माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे !

व्यथा असो आनंद असू दे
प्रकाश किंवा तिमिर असू दे
वाट दिसो अथवा न दिसू दे, गात पुढे मज जाणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे !

कधी ऐकतो गीत झऱ्यातुन
वंशवनाच्या कधी मनातुन
कधि वाऱ्यातुन, कधि ताऱ्यांतुन झुळझुळतात तराणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे !

तो लीलाघन सत्य चिरंतन
फुलापरी उमले गीतातुन
स्वरास्वरातुन आनंदाचे नित्य नवे नजराणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे !

या विहगांनो माझ्यासंगे
स्वरांवरी हा जीव तरंगे
तुमच्यापरि माझ्याहि स्वरांतुन उसळे प्रेम दिवाणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे !

REFBK-0025936

REFBK-0025936